आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२४ जानेवारी २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय बालिका दिवसानिमित्त मुलींना सक्षम बनवण्यासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा प्रधानमंत्र्यांकडून पुनरुच्चार

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराला वेग

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेतून नोवाक जोकोविचने माघार घेतल्याने अलेक्झांडर झ्वेरेव्ह अंतिम फेरीत दाखल

**आणि**

- भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट झाल्यानं ८ जणांचा मृत्यू तर ७ जण जखमी

<><><><><><>

देशभरात आज राष्ट्रीय बालिका दिवस साजरा केला जात आहे. मुलींचे अधिकार, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता याविषयी समाजात जनजागृती करण्याच्या दृष्टीनं दरवर्षी २४ जानेवारीला हा दिवस साजरा केला जातो.  “उज्ज्वल भविष्यासाठी मुलींना सक्षम करणं” ही यावर्षीच्या बालिका दिनाची संकल्पना आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निमित्त, मुलींना सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांना विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेची दशकपूर्ती नुकतीच झाल्यानं राष्ट्रीय बालिका दिनाचं औचित्य साधून आज देशभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.  बेटी

बचाओ बेटी पढाओ योजनेच्या माध्यमातून स्त्री भ्रूण हत्या, बाल विवाह आणि लिंग भेदभाव यांसारख्या गंभीर मुद्द्यांवर उपाय शोधण्याला आणि मुलींच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिलं जात आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहारचे माजी मुख्यमंत्री, भारतरत्न दिवंगत कर्पुरी ठाकूर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. ठाकूर यांनी आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक न्यायासाठी समर्पित केलं, त्यांचा आदर्श देशातल्या प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

गृहमंत्री अमित शहा यांनीही कर्पुरी ठाकूर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. कर्पुरी ठाकूर यांचं जीवन हे समाजातील शोषित आणि मागासवर्गीयांसाठी संघर्ष आणि न्यायाची एक अविस्मरणीय गाथा आहे. कर्पुरी ठाकूर साधेपणा, स्वाभिमान आणि जनसेवेचे उदाहरण आहेत, असं अमित शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

प्रयागराज मध्ये महाकुंभमेळ्यात आजपासून तीन दिवसांच्या नयनरम्य ड्रोन शो ला सुरुवात होणार आहे. या विशेष ड्रोन शो मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं सनातन धर्माची वैशिष्टयं, परंपरा आणि वारसा दाखवला जाणार आहे. याशिवाय महाकुंभ मेळ्याचं धार्मिक महत्व आणि त्यामागची कथा हे या ड्रोन शो चं मुख्य आकर्षण असेल. मेड इन इंडिया उपक्रमाअंतर्गत तयार करण्यात आलेले अडीच हजार ड्रोन्स सलग तीन दिवस वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित सादरीकरण करणार आहेत.

ड्रोनच्या साहाय्यानं पवित्र संगम स्थळी, समुद्र मंथन आणि अमृत कलश या पौराणिक घटना चित्रमयरित्या साकारल्या जाणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. आज दुपारी बारा वाजण्याच्या सुमाराला ते नाशिक मध्ये दाखल झाले. त्यानंतर त्यांनी त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाचं दर्शन घेतलं. नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव तालुक्यात अजंग गावात आयोजित सहकार परिषदेसह विविध कार्यक्रमांना शहा उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर मुंबईत राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाच्या कॉर्पोरेट कार्यालयाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ निमित्तानं वर्षभरात राबवण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या दिनदर्शिकेचं प्रकाशन आणि देशभर नव्यानं स्थापन झालेल्या १० हजार नवीन बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात यावेळी करण्यात येणार आहे.

<><><><><>

वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज आणि उद्या होणार असून, त्यात एकेका कलमावर चर्चा होणार आहे. खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करत असून, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेवटच्या दिवशी ही समिती आपला अहवाल सादर करणं अपेक्षित आहे. सध्या काही सदस्य पाटणा, कोलकता आणि लखनौ दौऱ्यावर असून तिथं स्थानिक वक्फ मंडळांच्या आणि अल्पसंख्याक विभागाच्या प्रतिनिधींशी चर्चा केली जात आहे.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत बॅटलफील्ड सर्व्हेलन्स सिस्टम - संजयचं उद्घाटन केलं. या वर्षी मार्चपासून तीन टप्प्यात ही यंत्रणा भारतीय सैन्यात समाविष्ट केली जाईल. ही प्रणाली विशाल भू-सीमांवर लक्ष ठेवण्यासाठी, घुसखोरी आणि हल्ले रोखण्यासाठी आणि युद्ध परिस्थितीचं अचूक विश्लेषण करायला मदत करेल. ही प्रणाली सैन्याची गुप्तचर आणि देखरेखीची क्षमता वाढवायला मदत करेल. संजय यंत्रणा भारतीय लष्कर आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड यांनी संयुक्तपणे स्वदेशी पद्धतीनं विकसित केली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात कर्तव्य मार्गावर संजय प्रणाली हे मुख्य आकर्षण असेल.

<><><><><>

येत्या ५ फेब्रुवारीला होणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला असून सर्व प्रमुख पक्षांचे नेते जाहीरसभा, रॅली, रोड शो आणि मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचार करण्यावर भर देत आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी, आज दिल्ली मतदारसंघात रॅली घेणार असून भाजपा नेते अनुरागसिंग ठाकूर, द्वारका, मंगोलपुरी आणि दिल्लीत विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत, तर भाजपा नेत्या बांसुरी स्वराज शालिमार मतदारसंघातल्या मतदारांशी संवाद साधणार आहेत. आपचे प्रमुख आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आज नजफगढ़, उत्तम नगर आणि दिल्लीत रोड शो घेणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी देखील आज काही ठिकाणी जाहीर सभा घेणार आहेत.

<><><><><>

येत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतल्या कर्तव्य पथावर पार पडणाऱ्या सोहळ्यासाठी पालघर जिल्ह्यातल्या मोहिते दांपत्याला आमंत्रित करण्यात आलं आहे. विश्वास मोहिते हे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचे लाभार्थी असून प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला उपस्थित राहण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. याबद्दल पूनम मोहिते यांनी अधिक माहिती दिली..

**होल्ड बाईट - मोहिते (१९सेकंद)**

<><><><><><>

मेलबर्न इथं सुरु असलेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीत आज सर्बियाच्या नोवाक जोकोविचनं दुखापतीमुळे अचानक माघार घेतली. नोवाक जोकोविच आणि जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव यांच्यात झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात पहिला सेट ७-६ असा गमावल्यावर नोवाक जोकोविचनं स्पर्धेतून मध्येच माघार घेतली. स्पेनच्या कार्लोस अल्काराझसोबत झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात जोकोविचच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. नोवाक जोकोविचनं या स्पर्धेचं विजेतेपद सर्वाधिक १० वेळा जिंकलं आहे. जोकोविचनं माघार घेतल्यामुळे अलेक्झांडर झ्वेरेव अंतिम फेरीत दाखल झाला आहे. झ्वेरेव्हला आता आपलं पाहिलं ग्रँड स्लॅम पदक जिंकण्याची संधी मिळाली असून त्याचा सामना इटलीचा टेनिसपटू यानिक सिन्नर किंवा अमेरिकेचा बेन शेल्टन यांच्यातल्या विजेत्याशी होणार आहे. अंतिम सामना येत्या रविवारी होणार आहे.

महिला एकेरीच्या अंतिम सामना उद्या होणार असून जागतिक क्रमवारीत अव्वल असलेली आरीना सबालेन्काचा सामना अमेरिकेच्या एकोणिसाव्या मानांकित मॅडिसन कीज सोबत होणार आहे.

<><><><><><>

भंडारा जिल्ह्यात आयुध निर्मिती कारखान्यात स्फोट होऊन त्यात ८ जणांचा मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले आहेत. हा स्फोट इतका भीषण होता की काही किलोमीटर परिसरात या स्फोटाचा आवाज ऐकू आला. कंपनीच्या सी ब्लॉक मध्ये हा स्फोट झाला असून या ठिकाणी जवळपास २० ते २५ लोक काम करत असल्याची माहिती मिळत आहे. जखमींना भंडारा इथं रूग्णालयात उपचारासाठी दाखल केलं आहे. घटनास्थळी पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत बचावकार्य सुरु आहे.

<><><><><><>

अभिनेता सैफ अली खान यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी काल त्यांचा जबाब नोंदवला. पोलिसांना दिलेल्या जबाबात सैफ अली खान यांनी १६ जानेवारीच्या रात्री त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचं तपशीलवार वर्णन केलं आहे. त्यांच्या घरात घुसलेल्या हल्लेखोराला रोखण्याच्या प्रयत्नात त्याने सहा वार केले, त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं, असं सैफ अली खान यांनी पोलिसांना सांगितलं आहे.

//<><><><><><>//